मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# लोणावळा स्काय वॉक प्रकल्पाबाबत बैठकांचे सत्र सुरु

## मावळच्या पर्यटन विकासाला नवी दिशा मिळणार: आमदार सुनील शेळके

**पिंपरी | प्रतिनीधी**

मावळ तालुक्यातील पर्यटनाला नवी ओळख देणारा आणि स्थानिक विकासाला गती देणारा लोणावळा स्काय वॉक प्रकल्प आता वास्तवात उतरण्याच्या मार्गावर आहे. पुणे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आमदार सुनील शेळके यांच्या उपस्थितीत झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत या प्रकल्पासंदर्भातील सर्वंकष चर्चा पार पडली.



उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासोबत झालेल्या प्राथमिक चर्चेनंतर झालेल्या या बैठकीत प्रत्यक्ष जागेचा तांत्रिक आढावा घेण्यात आला. विकास आराखड्यातील जागांची पडताळणी, पर्यायी कनेक्टिव्हिटी रस्त्यांची आखणी, तसेच पर्यटनवाढीद्वारे स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर ठोस उपाययोजना ठरविण्यात आल्या. बैठकीत पर्यटनक्षेत्रातील पायाभूत सुविधा उभारणी, स्थानिक उद्योजक व तरुणांना प्रोत्साहन आणि शाश्वत विकासासाठी शासनस्तरावर प्रस्ताव पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयांमुळे मावळ तालुक्यातील नागरिकांसाठी रोजगार, व्यवसाय व उद्योगधंद्यांचे नवे दालन खुले होणार आहे. तसेच या प्रकल्पामुळे मावळ तालुक्याला पर्यटननकाशावर आंतरराष्ट्रीय ओळख मिळेल. आमदार सुनील शेळके यांच्या प्रयत्नांमुळे पवना धरण परिसरासह मावळातील गावांचा विकास वेगाने होईल आणि पर्यटनाचा नवा अध्याय सुरू होईल असा विश्वास मावळ तालुक्यातील नागरिक व्यक्त करत आहेत.

---

# मातृशक्तीचा अपमान करणाऱ्या काँग्रेसचा भाजपाकडून तीव्र निषेध

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्रींचा अपमान केल्याच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाचे जोरदार आंदोलन

**पिंपरी | प्रतिनीधी**

काँग्रेस पक्षाने बिहार निवडणुकीच्या प्रचारादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्रींचा अपमान केल्याच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाने आज पिंपरी- चिंचवडमध्ये जोरदार आंदोलन केले. "स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी" या भारतीय संस्कृतीचा आणि मातृशक्तिचा अवमान करणाऱ्या काँग्रेसच्या विचारधारेचा निषेध करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले.




शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे आणि महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ.सुजाता पालांडे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. या आंदोलनात शहरातील भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विशेषतः महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. पिंपरी येथील भाजपा पक्ष कार्यालयाजवळ सकाळी १० वाजता हे आंदोलन झाले.

शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. "काँग्रेसची विचारधारा नेहमीच विष पेरणारी असून, ती नारीशक्तीचा अवमान करणारी आहे," असा आरोप त्यांनी केला. पंतप्रधान हे देशाचे असतात आणि त्यांच्या आईबद्दल अपशब्द वापरणे, तसेच त्यांचे वाईट पद्धतीने चित्र रेखाटणे हा देशातील सर्व मातांचा अपमान आहे, अशी भूमिकाही काटे यांनी मांडली. "ही मातृशक्ती कधीही सहन करणार नाही," असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

या आंदोलनातून काँग्रेसच्या या कृत्याचा तीव्र निषेध करण्यात आला. आंदोलनकर्त्यांनी घोषणाबाजी करत काँग्रेसविरोधात संताप व्यक्त केला. कोणत्याही व्यक्तीने मातृशक्तीचा अनादर केल्यास तो सहन केला जाणार नाही, असा ठाम संदेश या आंदोलनातून देण्यात आला. तसेच,जनतेलाही मातृशक्तीच्या सन्मानासाठी एकत्र येण्याचे आवाहन करण्यात आले. या आंदोलनात शहरातील विविध मंडळांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

शहरात ठिकठिकाणी मंडलनिहाय आंदोलने पार पडल्याने काँग्रेसविरोधात तीव्र रोष दिसून आला. मातृशक्तीच्या सन्मानासाठी भाजपाचे हे आंदोलन लक्षवेधी ठरले असून भाजपाच्या महिला पदाधिकाऱ्यांकडून काँग्रेस पक्ष कार्यालयात बांगड्या पाठविण्यात येणार आहे.

यावेळी संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस वैशाली खाडये, सरचिटणीस मधुकर बच्चे, उपाध्यक्ष राम वाकडकर, राजू दुर्गे, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, प्रवक्ते कुणाल लांडगे, अजित बुर्डे, रमेश वहिले, विजय शिणकर, राजेंद्र बाबर, मंडल अध्यक्ष सोमनाथ तापकीर, मोहन राऊत, गणेश ढोरे, अनिता वाळुंजकर, नामदेव पवार, हरीश मोरे, इंजी. आघाडी प्रमुख संतोष भालेराव, डॉक्टर सेल अध्यक्ष डॉ.अमित नेमाने, दिव्यांग सेल अध्यक्ष अंकुश शिर्के, वैद्यकीय प्रकोष्ठ अतुल गाडगे, ट्रान्सपोर्ट प्रकोष्ट संयोजक सुनील लांडगे, संतोष टोणगे, सचिन राऊत, खंडूदेव कठारे, ॲड.हर्षद नढे, कायदा आघाडी अध्यक्ष ॲड. गोरख कुंभार, ॲड.युवराज लांडे, सोशल मीडिया सेल अध्यक्ष सागर बिरारी, जिल्हा कार्यकारणी सदस्य सुनील लांडगे, कविता हिंगे, दिपाली कलापुरे, रेणुका हेगडे, सीमा बोरसे, सीमा चव्हाण, सुनीता जगताप, मंजू गुप्ता, अनघा रुद्र, रंजनाताई जगताप, नीताताई भालेराव, अनिता चोपडे, लक्ष्मी काची आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# अंगणवाडी ते वाघू साने चौक रस्त्या दुरुस्तीची मागणी

## यश साने यांचे महापालिका प्रशासनाला निवेदन; पाऊस पडल्यानंतर पुन्हा रस्त्याची दुर्दशा

**पिंपरी | प्रतिनिधी**

साने चौक परिसरातील अंगणवाडी रस्ता, चिंचेचा मळा आणि वाघू साने चौक रस्त्याची दुर्दावस्था झाली असून, लवकरात-लवकर दुरुस्तीसह डांबरीकरण करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

मागील काही महिन्यांपूर्वी महापालिका अधिकाऱ्यांना पाठपुरावा केल्यानंतर रस्त्यावर खडी टाकण्यात आली. मात्र पाऊस पडल्यानंतर पुन्हा रस्त्याची दुर्दशा झाली आहे. रस्त्यावर खड्डे व जागोजागी खराब झाला आहे. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. महापालिका प्रशासन कोणाचा जीव गेल्यावर लक्ष देणार का असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

> पाऊस उघडण्याची वाट पाहतो आहेत. या कामाबाबतची निविदा आहे. या रस्त्यावर स्ट्रॉमवॉटर लाईनचे काम केलेले असून, त्यावेळीही खड्डे जीएसबीनी भरले होते. पावसामुळे रस्ता खराब झाला असून, लवकरच डांबरीकरणाचे प्लांट सुरु होताच काम सुरु केले जाईल.
>
> **- शिवाजी चौरे, फ प्रभाग स्थापत्य विभाग.**

> अंगणवाडी रस्ता व चिंचेचा मळा, वाघू साने चौक रस्त्यावरती खड्डे व जागोजागी रस्त्या खराब झाला आहे. याबाबत फ प्रभाग अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. लवकरात-लवकर हा रस्ता दुरुस्त करण्याची मागणी करण्यात आली आहे.
>
> **- यश साने, युवा नेते.**



# ‘अंदाजपत्रकात नागरी सहभाग’ उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## अर्थसंकल्प 2026–27 अधिक लोकाभिमुख करण्यासाठी जास्तीतजास्त अभिप्राय नोंदवण्याचे उपायुक्त अण्णा बोदडे यांचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड हे देशातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक असून पिंपरी चिंचवड महापालिका दरवर्षी अर्थसंकल्प तयार करताना नागरिकांचे अभिप्राय व सूचना विचारात घेते. त्या अनुषंगाने आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली ‘अंदाजपत्रकात नागरी सहभाग’ हा उपक्रम महापालिकेने हाती घेतला असून या उपक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन अर्थसंकल्प २०२६-२७ साठी जास्तीतजास्त अभिप्राय नोंदवावेत, असे आवाहन महापालिका उपायुक्त अण्णा बोदडे यांनी केले आहे.





महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते १५ ऑगस्ट २०२५ रोजी ‘अंदाजपत्रकात नागरी सहभाग’ या उपक्रमाला सुरुवात झाली. या उपक्रमांतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने निगडी येथील एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट महाविद्यालयातील सभागृहात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उपायुक्त अण्णा बोदडे बोलत होते. कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवडकर, शैक्षणिक विभागप्रमुख डॉ. रूपाली कुदरे, सहयोगी प्राध्यापक डॉ. काजल महेश्वरी आदी उपस्थित होत्या.

उपायुक्त अण्णा बोदडे म्हणाले, ‘भारत सरकारने केलेल्या सर्वेक्षणात देशभरातील राहण्यायोग्य उत्तम असणाऱ्या शहरांमध्ये आपल्या पिंपरी चिंचवड शहराचा समावेश झाला आहे. शहरातील पायाभूत सुविधा, औद्योगिक उपलब्धता, शैक्षणिक संस्था, वैद्यकीय सुविधा, सार्वजनिक वाहतूक सुविधा शहराच्या प्रगतीला गती देत असतात. केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशभरातून पिंपरी चिंचवड शहरात नागरिक कामानिमित्त येत असतात. त्यातील बहुतांश नागरिकांचा पिंपरी चिंचवड शहरात स्थायिक होण्याकडे कल वाढला असून सध्या शहराची लोकसंख्या ३० लाखांवर पोहोचली आहे. या शहराचा विकास वेगाने होत असून या विकासाला आकार देण्यात नागरिकांना सक्रिय सहभागी होता यावे, यासाठी महापालिकेने ‘अंदाजपत्रकात नागरी सहभाग’ उपक्रम राबवत आहे. या उपक्रमात जास्तीतजास्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी, तरुणांनी सहभागी व्हावे,’ असेही उपायुक्त बोदडे म्हणाले.

### विविध उपक्रमांची विद्यार्थ्यांना दिली माहिती..

» पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध उपक्रमांची माहिती उपायुक्त बोदडे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिली. ते म्हणाले, ‘महापालिकेशी संपर्क साधण्यासाठी ‘पीसीएमसी स्मार्ट सारथी’ ॲप निर्माण करण्यात आले आहे, ज्यावर महापालिकेच्या सर्व विभागांची माहिती व संपर्क साधण्याची सोय उपलब्ध आहे.’ यावेळी उपायुक्त बोदडे यांनी हरित सेतूसह विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच ‘अंदाजपत्रकात नागरी सहभाग’ या उपक्रमांत सहभागी होऊन अभिप्राय कसा नोंदवावा, याची माहिती देखील दिली.

### असा नोंदवा अभिप्राय..

» नागरिकांना महापालिकेच्या pcmcindia.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाईन अर्ज भरून अभिप्राय नोंदवता येईल.

» तसेच नागरिक या https://www.surveymonkey.com/r/D8TBZRH लिंकला भेट देऊन ऑनलाईन अभिप्राय नोंदवू शकतात.

» पीसीएमसी स्मार्ट सारथी ॲप डाउनलोड करून तेथेही नागरिकांना अभिप्राय नोंदवता येईल.

# पुणे प्रभागरचनेवर 5922 हरकती

## पहिल्या दिवशी 2 हजार 920 हरकती; सुनावणीसाठी उपस्थित केवळ 828 चर्चांना उधान!



**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या प्रारूप प्रभागरचनेवर हरकतींचा पाऊस पाडत ५ हजार ९२२ जणांनी हरकती दाखल केल्या. मात्र, सुनावणीला प्रत्यक्षात अवघे ८२८ जण हजर राहिल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रारूप प्रभागरचना ही भाजपच्याद्दष्टीने सोयीची झाल्याचा आरोप विरोधी पक्षाकडून करण्यात येत असताना, हरकत घेणारे उर्वरित नागरिक का आले नाहीत, याबाबत आता प्रश्न उपस्थित झाला आहे.

सर्वाधिक हरकती प्रभाग ३४ – नऱ्हे-वडगाव बुद्रुक, आणि प्रभाग १५ – मांजरी बुद्रुक-साडेसतरा नळी या प्रभागांतून आल्या आहेत. आता ८२८ हरकतींची दखल घेऊन प्रभागांमध्ये बदल होणार का? याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर सचिव व्ही. राधा यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. गेले दोन दिवस बालगंधर्व रंगमंदिर येथे या हरकती आणि सूचनांवर सुनावणी घेत हरकत नोंदविणाऱ्यांची बाजू ऐकण्यात आली. यावेळी पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उपायुक्त प्रसाद काटकर, प्रशांत ठोंबरे उपस्थित होते.

गुरुवारी (११ सप्टेंबरला) पहिल्या दिवशी २ हजार ९२० हरकती सुनावणीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. त्यापैकी ५४० जणांनी म्हणणे मांडले. शुक्रवारी २८८ जणांनी बाजू मांडली. हरकती नोंदविलेल्या ५ हजार ९२२ जणांपैकी अवघे ८२८ नागरिकांनी सुनावणीसाठी हजेरी लावल्याचे स्पष्ट झाले आहे.

**अंतिम प्रभागरचना ३ ते ६ ऑक्टोबर दरम्यान जाहीर**

प्रारूप प्रभागरचनेवरील हरकतींवरील सुनावणीचा अहवाल १५ सप्टेंबरपर्यंत नगरविकास विभागाकडे पाठविला जाणार आहे. त्यानंतर नगरविकास विभागाकडून राज्य निवडणूक आयोगाकडे हा अहवाल जाणार असून, राज्य निवडणूक आयोगाकडून अंतिम प्रभाग रचना ३ ते ६ ऑक्टोबर या दरम्यान जाहीर होणार आहे.

### कडेकोट बंदोबस्त

» हरकती नोंदविण्याच्या पहिल्या दिवशी काही नागरिकांनी गोंधळ घातला होता. त्यामुळे बालगंधर्व रंगमंदिर परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. हरकत नोंदविणाऱ्यांकडील पावती आणि ओळखपत्र तपासल्यानंतरच त्यांना प्रवेश देण्यात आला.

### हरकतींचे स्वरूप

- » प्रभागरचना करताना नैसगिक सीमा रेषांचे उल्लंघन
- » काही भागांतील अनुसूचित जातीचे (एससी) आरक्षण बदलण्यासाठी लोकसंख्येचे विभाजन
- » सीमारेषा आखताना नैसर्गिक हद्दी विचारात घेतलेल्या नाहीत
- » राष्ट्रीय महामार्ग, मुख्य रस्ते, नद्या, नाले, डोंगर, रेल्वे रूळ हे ओलांडून प्रभागांची रचना

# पर्यावरण संरक्षणासाठी सायकल चालवा

## माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांचे प्रतिपादन; 'पुणे ऑन पेडल्स' सायकल रॅलीमध्ये हजारो पुणेकरांचा सहभाग



**पुणे | प्रतिनिधी**

"शारीरिक स्वास्थ्य, पर्यावरण संरक्षणासाठी सायकल चालवणे अतिशय उपयुक्त आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फिट इंडियाचा नारा दिला असून, त्यांनी दिलेल्या पंचसुत्रीवर पुणेकरांनी आपले आरोग्य चांगले राखावे," असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त पुण्यात राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या पुढाकाराने आयोजित पुणे ऑन पेडल्स सायकल रॅली व पुणे वॉकेथॉनमध्ये हजारो पुणेकर सहभागी झाले. सायकल रॅलीचा मार्ग कोथरूडमधील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते झाशीची राणी लक्ष्मीबाई पुतळा, बालगंधर्व चौक, तर वॉकेथॉनचा मार्ग एसएनडीटी महाविद्यालयापर्यंत होता.

माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या हस्ते रॅलीला हिरवा झेंडा दाखवून सुरुवात झाली. प्रसंगी पुणे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, क्रिकेटपटू केदार जाधव, महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे यांची प्रमुख उपस्थिती यावेळी होती. विश्राम कुलकर्णी, जयंत भावे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. ७५ गरजू मुलामुलींना सायकल भेट देण्यात आली.

ठाकूर म्हणाले, "पुण्यातील पर्यावरण मित्रांनी (पीएम) देशाच्या प्राईम मिनिस्टरांना (पीएम) दिलेली ही मानवंदना आहे. मेधाताई यांच्याप्रमाणे इतर लोकप्रतिनिधींनीही असे पर्यावरणपूरक उपक्रम राबवून समाजाचे स्वास्थ्य चांगले राहण्यासाठी पुढाकार घ्यावा. देशवासीयांचे आरोग्य सदृढ व्हावे, यासाठी मोदी यांनी योगदिन, फिट इंडिया, खेलो इंडिया असे अनेक उपक्रम सुरु केले आहेत."

मिसाळ म्हणाल्या, "पुणेकरांनी पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारावी, सायकल वापरल्यामुळे प्रदूषण नियंत्रणास मदत होतेच पण आरोग्यदायी जीवन जगणेही शक्य होते. समाजात जनजागृती व्हावी यासाठी अशा उपक्रमांना प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे. मेधाताईंनी घेतलेला हा उपक्रम पुणेकरांच्या शारीरिक व पर्यावरण स्वास्थ्याचा समतोल राखणारा आहे.

" सायकल वापरण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम गेल्या सहा वर्षांपासून आयोजित केला जात आहे. सायकलचे शहर अशी पुण्याची ओळख आहे. सायकल वापरणे आरोग्यासाठी लाभदायक आहे. पर्यावरणपूरक उपक्रमांतून आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस साजरा होतोय, याचा आनंद वाटत असल्याचे प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात सांगितले.

जवळपास पाच हजार आबालवृद्ध यामध्ये मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. योगपटू स्वरा केंजळे, ट्रेकर नंदकिशोर मुळीक, आयर्न किड विहान काशीकर, जॉगलिंग खेळाडू केतन अमोणकर यांचा क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल सन्मान करण्यात आला. जयंत भावे यांनी सूत्रसंचालन केले. विश्राम कुलकर्णी यांनी आभार मानले.

# नागरिकांचे प्रश्न सोडवणे हे सरकारचे काम

## त्याचा वेगळा अर्थ काढू नये, जनसंवाद यात्रेत अजित पवार यांची प्रतिक्रिया

**पुणे | प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांच्या समस्यांची जाणून घेण्यासाठी जनसंवाद यात्रा सुरू केली खरी, मात्र यासाठी प्रशासनातील तब्बल ३० विभागांच्या प्रमुखांनाच अक्षरश: वेठीस धरण्यात आले. कार्यक्रम पक्षाचा मात्र, महापालिका, जिल्हा प्रशासनापासून संबंध सरकारी यंत्रणा दावणीला बांधण्यात आली. हडपसर मतदारसंघातील समस्यांशी आमचा काय संबंध? मात्र, आदेश निघाले आणि आम्हाला हजर राहावे लागले अशी दबक्या आवाजात प्रतिक्रिया अनेक अधिकाऱ्यांनी दिली. मात्र, हे सरकारचे काम आहे, सध्या नागरिकांची प्रश्न सोडवत आहे. त्याचा वेगळा अर्थ काढू नये, अशी प्रतिक्रिया पवार यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

महापालिका निवडणुका स्वबळावर लढविण्याचे संकेत यापूर्वीच अनेकदा दिले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पवार यांनी हडपसर मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी शनिवारी राष्ट्रवादी जनसुनावणी ठेवण्यात आली होती. या समस्या सोडविण्यासाठी पवार व्यक्तिश: लक्ष घालणार असल्याची जाहिरात सर्वत्र केल्याने नागरिकांनी या सुनावणीला मोठी गर्दी केली होती. या जनसुनावणीसाठी पवार यांच्या मुंबईच्या कार्यालयातून जिल्हा प्रशासनाला संबंधित अधिकाऱ्यांची उपस्थिती बंधनकारक असल्याचे पत्र काढण्यात आले. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने तब्बल ३० विभागांना आपल्या प्रमुखांसह अन्य अधिकाऱ्यांना या पक्षाच्या जनसुनावणीला उपस्थित राहण्याचे फर्मान सोडले.

यावेळी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्यासह जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी हे व्यासपीठावरच अजित पवार यांच्या शेजारी बसलेले होते. मात्र, आमदार चेतन तुपे आणि अन्य पदाधिकारी मात्र, नागरिकांच्या गर्दीचे व्यवस्थापन करत होते. सर्व ३० विभागांचे अधिकारी सभागृहात उपस्थित होते. या समस्यांमध्ये सांडपाणी व्यवस्था, रस्ते, पाणीपुरवठा, कचरा तसेच काही वैयक्तिक स्वरूपाच्या समस्या होत्या. यातील बहुतांश पालिका स्तरावरील असल्याने महापालिका प्रशासनाची उपस्थिती समजू शकणारी होती.

**थेट संबंध**

मुळात हा कार्यक्रम पक्षाशी संबंधित होता. तसेच हा मतदारसंघ शहरी असल्याने मुख्यत्वे शहराशी आणि पालिकेशी संबंधित नागरिकांच्या समस्या असल्याने अन्य विभागांचा काहीही संबंध नसल्याने या सर्व अधिकाऱ्यांना जवळपास पाच तास कार्यक्रमस्थळी तिष्ठत राहावे लागले. थेट संबंध नसला तरी आदेश आल्यानंतर यावेच लागले अशा दबक्या आवाजात प्रतिक्रिया अधिकारी यावेळी देत होते.




### विविध विभागांचे प्रमुख उपस्थित

» मात्र, जिल्हा परिषद, पिंपरी चिंचवड पोलिस, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभागाचा राष्ट्रीय महामार्ग विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाचा पूर्व भाग, पीएमआरडी, महावितरण, राज्य रस्ते मार्ग परिवहन, एमआयडीसी, राज्य रस्ते विकास महामंडळ, मत्स्य विभाग, भूमी अभिलेख, विभागीय पर्यटन कार्यालय, कृषी विभाग, अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हा क्रीडाधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुरातत्त्व विभाग, जिल्हा शल्यचिकित्सक अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जलसंपदा विभाग खडकवासला प्रकल्प, पाटबंधारे विभाग, उपविभागीय अधिकारी हवेली, तहसीलदार हवेली, गटविकास अधिकारी जिल्हा परिषद आदी विभागांचे बहुतांश विभागप्रमुख तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

> मी राज्य सरकारचा उपमुख्यमंत्री म्हणून येथे बसलो आहे. हे सरकारचे काम आहे, सध्या नागरिकांची प्रश्न सोडवत आहे. सगळे अधिकारी येथे आहेत. आम्हाला सगळ्यांचे प्रश्न सोडवायचे आहेत. या अधिकाऱ्यांची ती जबाबदारी आहे. पालकमंत्री म्हणून माझ्यावर जबाबदारी आहे. वेगळा अर्थ काढू नका.
>
> **- अजित पवार, उपमुख्यमंत्री.**

# जिल्ह्यात उडीद, मका, सोयाबीन व तुरीचा अधिक पेरा

## जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आळेफाटा उपबाजारात कांद्याच्या आवकेत मोठी वाढ

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आळेफाटा उपबाजारात शुक्रवारी (दि. 12) कांद्याच्या आवकेत मोठी वाढ झाली. मात्र लिलावात कांदा बाजारभावात झालेल्या घसरणीमुळे शेतकरीवर्गाच्या आर्थिक अडचणीत वाढ झाली आहे. लिलावात चांगल्या प्रतीच्या दहा किलो कांद्यास 161 रुपये कमाल भाव मिळाला, अशी माहिती सभापती संजय काळे, उपसभापती प्रीतम काळे यांनी दिली.

आळेफाटा उपबाजारात शुक्रवारी झालेल्या कांदा भावातील घसरणीमुळे कांद्याची साठवण केलेल्या शेतकरीवर्गाचे पदरी मोठी निराशा पडली. अनेक शेतकरीवर्गाने उन्हाळ्यात काढणी झालेल्या कांद्यास त्यावेळेस समाधानकारक भाव नसल्याने कांद्याची साठवण केली.

पावसाचा फटका साठवणूक केलेल्या कांद्यास बसू लागला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांपुढे कांदा विक्रीशिवाय पर्याय राहिला नाही. त्यातच सध्याचा बाजारभाव हा उत्पादन खर्चही वसूल होत नसल्याचे शेतकरी सांगतात.

आळेफाटा उपबाजारात जुलै महिन्याचे मध्यापासून पावसाचा फटका बसू लागल्याने कांदा आवक वाढली आहे. कांदा भावात घसरण सुरूच आहे. शुक्रवारी झालेल्या लिलावात कांदा भावात घसरण झाली. आजच्या लिलावात 22 हजार 223 गोणी विक्रीस आल्याची माहिती संचालक नबाजी घाडगे, सचिव रूपेश कवडे, कार्यालय प्रमुख दीपक मस्करे यांनी दिली.



### लिलावात प्रतिदहा किलोस मिळालेले भाव (रुपयांत)

» एक्स्ट्रा गोळा : 150 ते 161
» सुपर गोळा : 130 ते 150
» सुपर मीडियम : 110 ते 130
» गोल्टी/ गोल्टा : 100 ते 110, 30 ते 90